Movie: He Daan Kunkvache
Year: 1983

Song: Aala Suryacha Parkash Aala
Lyricist: Kavi Sanjeev

आला सूर्याचा परकाश आला
मुखडा चंद्राचा तुकडा आला
शीळ घालीत वारा आला
नंद यशोदेचा शाम आला
मला सुचंना
मला सुचंना गं काम-धाम
आला आला गं आला शाम
आला आला गं आला शाम
मला सुचंना गं काम-धाम
आला आला गं आला शाम
आला आला गं आला शाम
शाम आला गोकुळाला
गाई गुरं नाचू दे
गोवर्धन गिरीधारी गावाला या पाहू दे
गोवर्धन गिरीधारी गावाला या पाहू दे
शाम आला गोकुळाला
बासुरी वाजू दे वाजू दे वाजू दे

कुकु डोळयात
डोळयात काजळ कपाळी
गेले नदीला
नदीला इसरून चोळी
घडा राहीला गं घरी सकाळी
अशी आली माझ्यावर पाळी
तुझ्या नादानं मी बदनाम
रे तुझ्या नादानं मी बदनाम
आला आला गं
आला आला गं आला शाम
आला आला गं आला शाम

शाम आला गोकुळाला
बासुरी वाजू दे
शाम आला गोकुळाला
बासुरी वाजू दे वाजू दे वाजू दे

रातभर झोप नाही
झोप नाही नसू दे
सपनाचा गोफ असा
गोफ मला विणू दे
मीच बाई धुंद झाले
धुंद मला होऊ दे
पहाटेच्या गुलाबाचा
काटा आला येऊ दे
साखरझोपं मधी कोण येतोयं
तेला येऊ दे
साखरझोपं मधी कोण येतोयं
तेला येऊ दे
येऊ दे येऊ दे येऊ दे
शाम आला गोकुळाला
बासुरी वाजू दे
शाम आला गोकुळाला
बासुरी वाजू दे वाजू दे वाजू दे

तुझ्या पायी रं
पायी रं लागलं मला खुळ
नितळ पानी हे
पानी हे झालंय गढूळ
कशी करावी मी आंघोळ
फुटलं आभाळाला काय डोळं

PlanetRead

Literacy for a Billion

धाई दिसंन आला घनश्याम
हो धाई दिसंन आला घनश्याम
आला आला गं
आला आला गं आला शाम
आला आला गं आला शाम

शाम आला गोकुळाला
बासुरी वाजू दे
शाम आला गोकुळाला
बासुरी वाजू दे बासुरी वाजू दे
बासुरी वाजू दे

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*